**प्रेस नोट** **दिनांक २६/०३/२०१९**

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

## आई-वडिलांच्या भांडणात लहान मुलाची व्यथा जाणली पोलीसांनी

दिनांक २४/०३/१९ रोजी रात्रौ ०१.०० वा चे सुमारास वारजे मार्शल डयुटीस असलेले पो.शि. कातुर्डे व कामथे पेट्रोलींग करीत असताना चांदणी चौकात त्यांना एक १० वर्षाचा मुलगा रडत बसलेला दिसला. मुलाकडे सायकल देखील होती. त्यांनी मुलास तो का रडत आहे, त्याचे बरोबर कोण आहे, त्याचे नाव काय, तो कोठे राहतो याबाबत त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव सांगुन रा. रूपीनगर, निगडी असे असल्याचे सांगितले. त्यास रूपीनगरचा पूर्ण पत्ता सांगता येत नव्हता. तो चांदणी चौकात कसा आला हे विचारले असता तो सायकलवर फिरत फिरत आला असल्याचे सांगून रस्ता चुकल्याचे सांगितले. म्हणून वारजे मार्शलने सदर मुलास पोलीस ठाण्यास आणून ठाणे अंमलदार मदतनीस म.पो.शि. थोरात, पारखे व मेमाणे यांचे ताब्यात देऊन रात्रगस्त अधिकारी पो.उप-निरी. अशोक येवले यांना कळविले. त्यांनी चिखली पोलीस ठाण्यास फोन करून ठाणे अंमलदार पो.ना.शिर्के यांना संपर्क साधून मिळून आलेल्या मुलाची हकीकत कळवून व्हॉटस ॲपवर सदर मुलाचा फोटो पाठवून दिला व मुलाच्या आई वडिलांचा शोध घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे पो.ना.शिर्के यांनी त्यांचे पोलीस ठाणे हद्दीत मुलाच्या नातेवाईकांचा शोध घेणेबाबत कळवून मुलाची आई नामे शशिकला बापू लांडगे रा. सदर हिचा शोध घेऊन तिचा मोबाईल नंबर पो.उप-निरी. येवले यांना कळविला. त्यांनी त्यांच्या मोबाईल नंबरवर संपर्क करून त्यांचा मुलगा वारजे पोलीस ठाण्यास असलेबाबत कळवून त्यांना वारजे पोलीस ठाण्यास बोलावून घेतले. त्यांचेकडे केले तपासात असे समजून आले की, त्यांचे व त्यांचे पतीचे वाद होऊन त्या रूपीनगर, निगडी येथे राहत असून त्यांचे पती धायरी येथे राहत आहेत. मिळून आलेला मुलगा हा त्याचे वडिलांकडे राहण्यास होता परंतु त्यास वडिलांकडे राहवयाचे नसल्याने त्याने सायकल घेतली व आईकडे जाण्यासाठी निघाला होता परंतु आईकडे जाण्यासाठी त्याला रस्ता समजला नाही म्हणून तो रडत बसला होता. पोलीसांना खरा प्रकार सांगितला तर पोलीस परत त्याला वडिलांकडे देतील म्हणून तो पोलीसांना काही सांगत नसल्याचे त्याने सांगितले.

मुलाच्या इच्छे प्रमाणे पोलीसांनी मुलास त्याचे आईच्या ताब्यात दिल्याने त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. मुलाने पोलीसांना हसतमुखाने निरोप देऊन त्याचे आई बरोबर निघून गेला.

